☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्रं./ प्रेस नोट / 284 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 21 / 07 / 2025

# नांदेड पोलीस दलातर्फे पोलीस कुटूबीयांकरीता संस्कार व योग शिबीराचे आयोजन..

**मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक, नांदेड यांची पोलीस अधिकारी / अंमलदार हे कामाच्या अनियमीत वेळे मुळे त्यांचे कुटुंबीय व मुलांना वेळ देवु शकत नसल्यामुळे पोलीसांचे कुटुंबीयांकरीता व मुलांकरीता मनोरंजनाच्या माध्यमातुन काही नाविन्यपुर्ण अनोखा उपक्रम राबवावा अशी संकल्पना होती. त्या अनुषंगाणे "मुक्तांगण खेळा व शिका" हा उपक्रम दि.20 / 07 / 2025 रोजी पोलीस लॉन,पोलीस कॉलणी स्नेह नगर नांदेड येथे राबविण्यात आला.

सदर उपक्रमाच्या अनुषंगाणे पोलीस अंमलदार व कुटुंबीय यांना अनुभवी व्याख्याते व योग शिक्षक यांचे द्वारे योगाचे महत्व व फायदे याबाबत माहीती देण्यात आली. तसेच पोलीस अधिकारी / अंमलदार यांचे मानसीक आरोग्य सुधारण्याकरीता, ताण व्यवस्थापणाकरीता काय करायला पाहीजे याबाबत अनुभवी व्याख्यात्यांनी प्रबोधन केले.

सदर उपक्रमाच्या अनुषंगाणे मुलांचे व्यक्तीमत्व घडवाताना मुले फक्त अभ्यासु असुन चालणार नाही तर त्यास त्याचे निखळ बालविश्व अनुभवता आल पाहीजे, तसेच हसत खेळत मुलांचा सर्वांगीन विकास झाला पाहीजे या बाबत व्याख्यात्यांनी मार्गदर्शन केले. मुलांनी मोबाईल पासुन दुर राहुन आउट डोअर खेळ खेळण्यावर भर दिला पाहीजे याकरीता पोलीस लॉन येथे विविध खेळ घेण्यात आले. सदर खेळांना पोलीस पाल्यांनी उत्स्फुर्द प्रतिसाद देवुन भाग घेतला व आनंद घेतला. पालकांनी मुलांकडे लक्ष देताना शिक्षणांवर लक्ष देत पालकांनी स्वता मुलांप्रमाणे विचार करून त्यांना वेळ दिला पाहीजे त्यांचे सोबत विविध खेळ खेळले पाहीजे या बाबत मार्गदर्शन करण्यात आले. सदर उपक्रमात विवध मनोरंजक गोष्टी, खेळ,डान्स,नाटके,गाणी घेण्यात आली.

सदर कार्यक्रमास मा.डॉ.अश्विनी जगताप,पोलीस उप अधीक्षक गृह,पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड, प्रभा पाटील मॅडम (संगीत शिक्षीका), स्वाती देशपांड मॅडम (समुपदेशक), पोलादवार सर (योगा टिचर) तसेच पोलीस अधिकारी,अंमलदार व त्यांचे कुटुंबीय असे उपस्थीत होते.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड